# प्रकरण 1 ले

## प्रास्ताविक

1.1 <u>प्रस्तावना</u> - सामाजिक परिस्थिती बदलते शैक्षणिक समस्या बदलतात म्हणुन अध्यापकांचे काम कठीण होते, उद्दिष्टे साध्य करणे अवघड जाते म्हणुन अध्यापकांचे काम अधिकच गुंतागुंतीचे होते. सामाजिक स्थित्यंतराबरोबर अध्यापकांचे कार्य सुध्दा बदलते म्हणुनच अध्यापन हा एक अत्यंत आव्हानात्मक व्यवसाय आहे. यात आर्थिक लाभ कमी परंतु विद्यार्थ्यांचा विकास स्वत:च्या डोळयांनी पाहण्याचे समाधान अध्यापकांना निश्चित मिळते.

अध्यापन हे दुस-यांसाठी केले जाते, स्वत:साठी नव्हे. असे असुनही त्यातुन फारसा आर्थिक लाभ नाही आणि मानसिक समाधान मिळेलच असे नाही. अध्यापक जन्माला यावा लागतो, तो घडवता येत नाही. याबरोबरच अध्यापन हे कला व शास्त्रा दोन्ही आहे असाही विचार प्रवाह आहे.

शिक्षक का केवळ 'Teacher' नसून तो 'Educator' आहे. म्हणुन विद्यार्थ्यांशी जिव्हाळयाने समरस होणे, त्यांच्या सुप्त गुणांचा शोध घेणे, विद्यार्थ्या मध्ये काही दोष व उणिव असतील तर त्यांच्या निराकरणाचा प्रयत्न करणे, पालकांच्या भेटी घेवुन विद्यार्थ्यांच्या विकासासंबंधी त्यांच्याबरोबर चर्चा करणे, त्यांना मार्गदर्शन करणे ही आज शिक्षकांची आवश्यक कर्तव्ये झाली आहेत.


एकविसावे शतक हे नव्या आव्हानांचे शतक आहे. ही आव्हाने ज्ञानविज्ञानाचा प्रस्फोट, अपेक्षांचा प्रस्फोट, लोकसंख्यचा प्रस्फोट, यामुळे निर्माण झालेली आहेत आणि यामुळेच एका बाजूला समस्यांचाही प्रस्फोट झालेला आहे. या सर्वांचा परिणाम शिक्षणाच्या आशयावर, उद्दिष्टांवर व शिक्षकांवर झालेला आहे. आजच्या विज्ञान युगात समाजामध्ये अनेक स्थित्यंतरे होत आहेत. जीवनाची मूल्ये नवे रुप धारण करीत आहेत. रोज नवे प्रश्न, नव्या समस्या निर्माण होत

आहेत. एकविसाव्या शतकासाठी शिक्षणाची जी आव्हाने आहेत. त्यांना सामोरे जाण्यासाठी केवळ शिक्षणासाठी अधिक आर्थिक तरतुद, शिक्षक प्राध्यापकांच्या पगाराची अधिक वरची श्रेणी, शाळांच्या आर्थिक सुसज्ज इमारती एवढेच करुन भागणार नाही. शिक्षणाची सद्यस्थिती पाहिली तर त्यात शैक्षणिक विषमता, भ्रष्टाचार, संख्यावृध्दि, व्यवसाय शिक्षणाची आबाळ, जीवन सन्मुखतेचा अभाव ,गुणवत्तेचा -हास, भौतिकवाद यामुळे शिक्षणाची केविलवाणी अवस्था झाली आहे.

शिक्षणातील विरोधाभास आपल्याला पदोपदी जाणवत आहे. परीक्षा अवघड झाल्या आहेत आणि सोप्याही झाल्या आहेत. शिक्षण हा राष्ट्रोध्दाराचा प्राण असतो. शिक्षण प्रक्रियेचा " आत्मा " शिक्षक हाच असतो. शिक्षण पध्दती, शिक्षण प्रक्रिया सजीव करुन ती सर्वोत्कृष्ट करणे आणि भावी समाजाची जडणघडण करणे या प्रक्रियेमध्ये शिक्षकाला अनन्य साधारण महत्व आहे.

## 1.11 शिक्षकाची भूमिका -

भविष्यकालिन समाज घडविण्याची शिक्षण ही एक प्रमुख प्रक्रिया आहे. शिक्षणाचा दर्जा आणि राष्ट्र उभारणीतील शिक्षणाचे योगदान यावर परिणाम करणा-या ज्या-ज्या गोष्टी आहेत. त्यामध्ये शिक्षकांचा दर्जा, त्यांची कार्यक्षमता आणि चारित्र्य या सर्वात महत्वाच्या बाबी आहेत. सध्याच्या काळात शिक्षकाला विविध प्रकारच्या भूमिका एकाच वेळी पार पाडाव्या लागतात.




इतर व्यवसायापेक्षा शिक्षक व्यवसाय मध्ये अनेक भूमिका एकाच वेळी पार पाडणे आवश्यक असते.

डॉ.न.रा.पारसनीस यांच्या ' शिक्षकाचे प्रशिक्षण ' या ग्रंथात शिक्षकाच्या भूमिकेविषयी पुढील बाबी सांगितलेल्या आहेत.

'' युनेस्कोचा 1968 चा ठराव शिक्षकाच्या भूमिकेविषयी म्हणतो की, शिक्षका मध्ये पुढील बाबींचा समावेश असला पाहिजे.

1 सामान्यज्ञान व वैयक्तिक संस्कृती हयांचा प्रत्येक शिक्षकांमध्ये विकास झाला पाहिजे.

2 दुस-यांना शिकविण्याची क्षमता असावयास पाहिजे.

3 चांगले मानवी संबंध घडविण्यासाठी ज्या तत्वज्ञानाची जरुरी आहे ते तत्वज्ञान अवगत असले पाहिजे.

4 सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतीक प्रगती अध्यापनामार्फत पार पाडता आली पाहिजे'' [2]

शिक्षण प्रक्रियेच्या बदलत्या स्वरुपानुसार शिक्षकाच्या भूमिकेत व कार्यातही अपरिहार्यपणे बदल होत चालला आहे. शिक्षक हा विद्यार्थ्यांचा मार्गदर्शक असावा, सल्लागार असावा, मित्रा असावा, तसेच तत्वज्ञही असावा अशाप्रकारची विचारसरणी शिक्षण शास्त्राज्ञांकडुन प्रगट होत आहे. या दृष्टिने शिक्षकाच्या भूमिकेचे स्वरुप आपण समजून घेतले पाहिजे.

प्रथम आपण अध्यापनाच्या पातळीवर विचार करु. पूर्वी शिक्षक स्वत:च विद्यार्थ्यांना सगळया गोष्टी शिकवुन मोकळे होत. परंतु आज शिक्षकाने विद्यार्थ्यांना आयते काहीही सांगू नये. त्यांना विचार करायला लावावे व स्वयंशिक्षणस प्रवृत्त करावे असे मानले जाते. परंतु यामुळे शिक्षकाचे शिकविण्याचे काम कमी झाले, त्याच्या शीरावरील जबाबदारीचे ओझे काही प्रमाणात कमी झाले असे सकृत दर्शनी भासते.

---

2 डॉ.न.रा.पारसनिस 'शिक्षकांचे प्रशिक्षण ' १९९३ (नुतन प्रकाशन पूणे पृ.क्र. २०)

परंतु खोल जावुन विचार केल्यास शिक्षकाची जबाबदारी वाढली आहे. वर्गात व्याख्याने झोडुन अभ्यासक्रम संपविणे बरेच सोपे आहेत. परंतु नव्या पध्दतीमध्ये शिक्षकाचे रुढ अर्थाने शिकविण्याचे प्रमाण कमी झाले असले तरी जबाबदारी वाढली आहे. शिक्षकाने प्रत्यक्ष न शिकविता वा विद्यार्थ्यांच्या शिकण्याच्या प्रक्रियेत अनावश्यक हस्तक्षेप न करता, त्यांना मार्गदर्शन करावे असे म्हटले जाते. तरी विद्यार्थ्यी योग्य रितीने शिकु शकतील, स्वयंशिक्षणचे कार्य सुयोग्य रितीने व इष्ट दिशेने चालू शकेल असे पर्यावरण - शैक्षणिक पर्यावरण निर्माण करण्याची जबाबदारी शिक्षकाचीच असते, व हे कार्य अधिक अवघड आहे असे दिसून येईल. बालककेंद्री शिक्षणात क्रिडा पध्दतींचा उपयोग केला जातो. परंतु क्रिडा याचा अर्थ मुलांनी हवे ते व हवे तसे खेळावे असा नव्हे, ज्या खेळांमधून मुलांच्या विविध प्रकारच्या मानसिक शक्तींचा विकास होईल, आत्माविष्काराची भरपूर संधी मिळेल व अभ्यासक्रमाचाही काही भाग पूर्ण होवु शकेल अशाच खेळांची योजना शिक्षकांला आखावी लागेल, प्रोजेक्ट पध्दतीत निरनिराळी प्रोजेक्टस् मुलेच निवडतात, हे खरे परंतु तत्पुर्वी त्यांच्याशी चर्चा करुन, त्यांच्या मनात अपेक्षित विषयाबाबत जिज्ञासा व समस्या निर्माण करुन योग्य तेच प्रोजेक्टस् घेण्यास प्रवृत्त करणे, जेव्हा विद्यार्थी त्यांचे नियोजन करतील तेव्हा त्यातील दोष त्यांच्या निदर्शनास आणून त्यांच्याचकडुन आवश्यक त्या सुधारण करवून घेणे हे फार महत्वाचे असते. स्वाध्यायपध्दती व मार्गदर्शनपर अध्यापन पध्दती ' (Assignment method and Supervised study) किंवा डाल्टन पध्दती या जर सफल व्हायच्या असतील तर त्यात दिले जाणारे स्वाध्याय हे अभ्यासा-त्मक प्रगतीला पोषक असेच असले पाहिजेत. लोकशाहीप्रधान अध्यापन पध्दतीत चर्चा,वादविवाद,परिसंवाद,चर्चासत्रे,कृतिसत्रे यांचे संयोजन योग्य प्रकारे करुन त्यातुन विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासाचे कार्य घडवुन आणणे हेही वाटते तितके सोपे

नाही. हेच विधान अभ्यास पूरक कार्यक्रमांच्या बाबतीतही करता येईल. शिवाय या कार्यक्रमांचे नियोजन व संयोजन करीत असतांना विद्यार्थ्यांना हे कार्यक्रम शिक्षकाने आपल्यावर लादले अशी जाणिव तर होवु नये, परंतु मिळालेल्या स्वातंत्र्याचा गैरउपयोग करण्याची प्रवृत्ती व परिस्थितीही निर्माण होवु नये, शिक्षक हा मित्र वाटावा, अधिकारी वाटु नये, परंतु त्याच बरोबर शिक्षकाबद्दल अनादर व उपेक्षावृत्तीही निर्माण होवु नये अशी ही तारेवरची कसरत आहे. तात्पर्य, शिक्षण विषयक नवा दृष्टिकोन व नव्या पध्दती या शिक्षकांसाठी एक नवे आव्हान आहे. त्यांना यशस्वी रीतीने राबवून घेण्यासाठी शिक्षकांमध्ये बुध्दीमत्ता, कल्पकता, योजकता, उपक्रम शिलता, प्रोयोगिक दृष्टी व नेतृत्व या गुणांची नितांत आवश्यकता आहे.

आज शिक्षक ही केवळ वर्गात शिकविणारे, अभ्यासक्रम पूर्ण करुन विद्यार्थ्यांची परिक्षेसाठी तयारी करुन देणारी व्यक्ती राहिली नाही. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाच्या सर्वांगिण विकासाला साहाय्य करण्याची जबाबदारी शिक्षकावर आहे. शिक्षकाच्या भूमिके विषयी म.बा.कुंडले यांच्या शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्रा यां ग्रथांत म्हटले आहे की, '' शिक्षक हा केवळ 'Teacher' नसून तो 'Educator' आहे. म्हणुन विद्यार्थ्यांशी जिव्हाळयाने समरस होणे, त्यांचे सतत निरिक्षण करुन त्यांच्या सुप्त गुणांचा शोध घेणे, त्या गुणांच्या विकासाला शालेय शिक्षणात वाव देणे, विद्यार्थ्यांमध्ये काही दोष व उणिव असतील तर त्यांच्या निराकरणाचा प्रयत्न करणे, पालकांच्या भेटी घेवुन विद्यार्थ्यांच्या विकासासंबंधी त्यांच्याबरोबर चर्चा करणे, त्यांना मार्गदर्शन करणे ही आज शिक्षकाची आवश्यक कर्तव्ये झाली आहेत. विद्यार्थ्यांनाही प्रभावित करु शकतो अन्यथा नाही.''[3].

---

३ म.बा.कुंडले '' शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र '' १९९६ (श्री. विद्या प्रकाशन पुणे) पृ.क्र. २१७

## 1.12 शिक्षण व्यवसायाचे वैशिष्ट्य व श्रेष्ठत्व :

प्रत्येक व्यवसायाचे समाज जीवनात विशिष्ट स्थान असते. महत्व असते ह वैशिष्ट्य किंवा महत्व त्या त्या व्यवसायाच्या कार्यावरुन ठरत असते. व्यवसायातुन समाजाच्या गरजांची पूर्ती किती प्रमाणात होते, समाजाला उभारणीच्या किंवा सामाजिक प्रगतीला व्यवसायाची किती मदत होते, यावर त्या व्यवसायाचे वैशिष्ट्य वा श्रेष्ठत्व अवलंबुन असते. वस्तुत: सामाजिक जीवनात प्रत्येक व्यवसायाची आवश्यकता असते. त्यामुळे व्यवसायांमध्ये श्रेष्ठ - कनिष्ठ असे भेद करणे उचित होणार नाही. परंतु उपयुक्तता हेच केवळ कोणत्याही व्यवसायाच्या श्रेष्ठतेचे मूल्य होवु शकत नाही. भौतिक गरजांना जीवनात महत्वाचे स्थान आहेच व त्या ज्या व्यवसायांच्या द्वारे भागल्या जातात त्या व्यवसायाबद्दल व तो व्यवसाय करणा-या लोकांबद्दल आपण सदैव कृतज्ञ राहिलेच पाहिजे. परंतु त्याहीपलीकडे जावुन व्यक्तिजीवन समृध्द करणारी, समाजजीवनाची धारणा करणारी, मानवी जीवनाचा स्तर उंचावणारी अशी जी काही मूल्ये आहेत त्यांचा परिपोष करणारा किंवा अशा ज्या काही वैयक्तिक, सामाजिक व मानवी गरजा आहेत. त्यांची पूर्ती करणारा जो व्यवसाय असेल त्याला समाजात श्रेष्ठ स्थान प्राप्त व्हावे हे स्वाभाविकच आहे. शिक्षण हा असाच एक व्यवसाय आहे. सर्व प्रकारच्या वैयक्तिक व सामाजिक विकासाचा पाया व शिक्षणातूनच घातला जाता. जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रातील प्रगतीचा आधार म्हणजे शिक्षण. योग्य शैक्षणिक संस्कारांच्या अभावी राष्ट्रीय प्रगतीसाठी निश्चित केलेली आपली सर्व ध्येये व उद्दिष्टे हे केवळ स्वप्नरंजनच ठरेल. देशाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी आज आम्हाला तंत्राज्ञ हवेत, शास्त्रज्ञ हवेत, कलावंत हवेत तसेच तत्वज्ञही हवेत, नेतृत्व हवे तसेच निष्ठावंत अनुयायित्वही हवे. या सर्वांच्या निर्मितीचे केंद्र म्हणजे शिक्षणक्षेत्र ! उपयुक्ततेचा हा अर्थ जर आपण घेतला तर समाजाच्या सर्व -

प्रकारच्या आवश्यकतांची पूर्ती करणारा शिक्षण हाच एकमेव व्यवसाय ठरतो.

शिक्षण व्यवसायाचे दुसरे एक महत्वाचे वैशिष्टय म्हणजे त्याचे सर्व व्यापेत्व किंवा सर्व स्पर्शित्व ! शिक्षण व्यवसायात कार्य करणा-या व्यक्तींचा - म्हणजे शिक्षकांचा समाजाच्या सर्व क्षेत्रातील, सर्व थरांतील व्यक्तींशी संबंध येतो. शिक्षकाला संपूर्ण समाजाजीवनाशी समरस व्हावे लागते, अखिल समाजाभिमुख दृष्टि ठेवावी लागते. अशाच आशयाचे उद्‌गार श्री.टी.एम्.स्टिनेट व अल्बर्ट ह्यूजेट यांनी आपल्या ' Professional Problems of Teachers' या ग्रंथांत काढले आहेत. ते म्हणतात ,''

....... Members of no other profession is so intimately involved in the lives of almost all the people of thecommuity sव involved in the task of improving the community, its economics political, social and culture life - as is the teacher ------ The teacher is involved with the aspirations of the total community "[4] शिक्षण व्यवसायाचे शेवटचे व अत्यंत महत्वाचे वैशिष्टय म्हणजे हा एक उदात्त व पवित्र व्यवसाय आहे. ज्ञानदान हे आमच्याच नव्हे तर सर्वच समाजांमध्ये अत्यंत पवित्र कार्य समजले जाते. व्यक्तींना संस्कारीत करण्याचे, त्याचे चारित्र्य घडविण्याचे, माणसातील मानष्य जागृत करण्याचे, त्याला पशुत्वाकडुन देवत्वाकडे नेण्याचे महान कार्य शिक्षणाला करायचे असते. राष्ट्रनिर्माण- कार्याची जी जबाबदारी शिक्षणावर सोपविण्यात येते, त्यावरुन समाजाची शिक्षणाकडुन काय अपेक्षा आहे, शिक्षणाच्या सामर्थ्याबद्‌दल समाजाची काय कल्पना आहे याची स्पष्ट जाणीव होवु शकते. आज शिक्षण व्यवसायात आर्थिक मूल्येही प्रविष्ट झाली आहेत. अर्थात कालमानानुसार असे होणे अपरिहार्यही आहे.

---

4 . म.बा.कुंडले '' शैक्षणिक तत्वज्ञान व शैक्षणिक समाजशास्त्र '' १९९६ (श्री. विद्या प्रकाशन पुणे) पृ.क्र. २१९

परंतु शिक्षणकार्याची महती मात्र त्यामुळे कमी होत नाही. शिक्षकाचा व्यवसाय हा एक धंदा असला तरी शिक्षकाची वृत्ती हा धर्म आहे. राष्ट्राचे भवितव्य घडविण्याचे, राष्ट्राच्या भवितव्याचे शिल्पकार निर्माण करण्याचे शिक्षण हे एक महत्वाचे साधन आहे.

1.13 शिक्षण व शिक्षक यांचे अवमूल्यन -

आज शिक्षणाकडे पाहण्याची लोकांची दृष्टी उपयुक्ततावादी झाली आहे. जे शिक्षण घेतल्यावर निश्चितपणे नोकरी मिळु शकेल ते शिक्षण लोकांना अधिक मोलाचे वाटते. दुर्दैवाने प्रचलित शिक्षणातुन नोकरीची समस्या सुटू शकत नाही. उलट बेकारांची संख्या नित्य वाढत आहे. मग अशा शिक्षणावर लोकांचा विश्वास कसा बसावा ? आणि विद्यार्थ्यांना त्या शिक्षणाबद्दल आस्था का वाटावी ? म्हणुनही शिक्षणाचे महत्व लोकांच्या नजरेतुन उतरत चालले आहे. एकुण शिक्षणाची निरुपयोगिता व शिक्षकांचा ढासळत चाललेला शैक्षणिक दर्जा व गुणवत्तेचा अभाव यामुळे शिक्षण व्यवसायाचे व सोबतच शिक्षकांचेही अवमूल्यन झाले आहे. शिक्षण व्यवसायाला व शिक्षकांनाही समाजात पूर्वीचे प्रतिष्ठेचे स्थान राहिले नाही. शिक्षक स्वत:च आपल्या व्यवसायावरील श्रध्दा आज गमावून बसला आहे. शिक्षणावरील सामर्थ्याबद्दलचा त्याचा विश्वासच नाहीसा झाला आहे.

या अवमूल्यनाला वरील परिस्थितीप्रमाणेच शिक्षकामध्ये शिरलेले इतरही दोष कारणीभुत आहेत. विद्वत्ता, ज्ञानलालसा, व्यवसायनिष्ठा इत्यादी गुण बहुसंख्य शिक्षकांमधुन अस्तंगत झालेले आहेत. त्याशिवाय शिक्षकांचे एकंदर वर्तन व चारित्र्य हे देखील आज आदर्श राहिले नाही. कित्येक शिक्षक स्वत:च आपल्या व्यवसायाची बदनामी करतात. वस्तुत: शिक्षण क्षेत्रातील खरे शक्तीकेंद्र म्हणजे शिक्षक. शिक्षक हा शिक्षणव्यवस्थेचा कणा ! परंतु या शिक्षकाचाच कणा

आज मोडला आहे. शिक्षकांमधील या उणिवा, हे अवगुण, हे ना विद्यार्थ्यांपासुन लपून राहिले आहेत. ना त्यांच्या पालकांपासुन ! आज समाजासमोर शिक्षकाचे जे चित्रा उभे आहे ते भ्रष्ट आहे, विकृत आहे. असा हा भ्रष्ट, पोटभरु, स्वाभिमानशुन्य व ज्ञानदरिद्री शिक्षक विद्यार्थ्यांवर कोणते संस्कार करणार व राष्ट्रीय प्रगतीला हातभार लावुन राष्ट्र् निर्मितीचे काम काय करणार ?

1.14 शासन व समाज जबाबदार -

शिक्षण - व्यवसायाच्या अवमूल्यानाला केवळ शिक्षकच जबाबदार आहेत, असे म्हणता येणार नाही. व्यवसायाच्या अवनतीचे खापर शिक्षकांवरच फोडणे त्यांना अन्यायकाक होईल. शासन,समाज, संचालक व पालक हे सर्वच घटक या व्यवसायाची प्रतिष्ठा खली ओढण्यात सहभागी आहेत. पहिला घटक म्हणजे शासन ! स्वातंत्रयोत्तर काळात राष्ट्र्-उभारणीच्या कार्यात शिक्षणाला जे अग्रस्थान -निदान महत्वाचे स्थान दयायचे ते शासनाने दिले नाही. अन्य क्षेत्राावर ज्या प्रमाणे पैसा खर्च केला गेला त्या मानाने शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण फार कमी पडते. शिक्षण पध्दतीत सुधारणा करण्याची तीव्र निकड असतानाही या कार्याला कधी अग्रक्रम दिला नाही. बरे सुधारणेच्या हेतूने जे आयोग नेमले, त्यांनी केलेल्या सूचनांची व शिफारशीची परिपूर्ण अमंलबजावणी करण्यातही अक्षम्य दिरंगाई दर्शविली. त्यामुळे शिक्षण पध्दती, राष्ट्राची प्रगती, राष्ट्राच्या गरजा व समस्या यांत सुसंवाद राहिला नाही. शिक्षण हे कालविसंगत होत गेले. शिक्षकांच्या पगाराबाबतही अशीच अनास्था ! या व्यवसायाचे राष्ट्रीय महत्व ओळखुन शिक्षकांवर पडणा-या थेर जबाबदा-यांची जाणीव ठेवुन गुणवान, बुध्दिमान व कार्यक्षम व्यक्ती शिक्षण व्यवसायाकडे आकर्षिक व्हाव्या अशा प्रकारचे वेतनमान व अन्य सवलतींची सोय करण्याच्या बाबतीतही फारशी दखल घेतली नाही. संचालकांच्याही बाबतीत काय बोलावे ? अनेक शाळा अशा

आहेत की ज्यांमध्ये शिक्षकांना नियमितपणे पगार मिळत नाही. पूर्ण पगार मिळत नाही. पूर्ण पगारावर सही घेणे व अर्धामुर्धा पगार हातात ठेवणे हा प्रकार सर्रास चालला आहे. शाळांना ना धड इमारती, ना प्रयोगशाळा, ना ग्रथांलय ना क्रिडांगण. एकेका वर्गात 50-60 विद्यार्थी कोंबलेले. या परिस्थितीत बिचारा शिक्षक तरी काय करणार ? केवळ राजकीय हेतूने व धनसंचय करण्याच्या उद्देशाने काढलेल्या शाळांचीही संख्या थोडी थोडकी नाही. परंतू शाळांचे आर्थिक दारिद्रय दूर करण्याचे सामर्थ्य जसे शासनात नाही तशीच धंदेवाई शाळांमधुन चालणा-या गैरप्रकारांना आळा घालण्याची हिंमतही नाही.

बरे, समाज वा पालकवर्ग तरी या बाबतीत जागरुक आहे काय? ज्या शिक्षकांच्या हाती आपलया मुलांचे भवितव्य सोपविले आहे त्या शिक्षकांच्या सुखदु:खाबद्दल अडीअडचणीबद्दल समाजाने कधी आस्था दर्शविली आहे काय ? शिक्षकांवर होणा-या अन्यायाच्या निषेधार्थ किंवा प्रतिकारार्थ पालकवर्गाने कधी पुढाकार घेतला आहे काय? आमची मुले फक्त परीक्षेत पास कशी होतील याची पालकांना चिंता. शिक्षकांबद्दल आदरभाव व्यक्त करणे त्यांना प्रतिष्ठेने वागविणे या गोष्टी समाजना अभावानेच आढळतील. उलट शिक्षण व्यवसाय व शिक्षकवर्गाचा उपहास, हेटाळणी, अप्रतिष्ठा यांचेच प्रमाण अधिक ! शासनाची अनास्था, संचालकाकडुन पिळवणुक, समाजाकडुन अवमान व विद्यार्थ्यांमध्येही आदराचा अभाव अशा चक्रव्यूहात आजचा शिक्षक सापडला आहे. अशा परिस्थितीत केवळ, शिक्षकदिन साजरे करुन काय होणार ? ' तुम्ही राष्ट्राचे आधारस्तंभ आहात ' असे व्यासपिंठावरुन त्यांना उपदेशाचे डोस पाजून त्याचा काय उपयोग होणार ? कोरडया सहानुभूतीतुन काय निष्पन्न होणार ?

समाजातील सर्वच क्षेत्रांत व सर्वच व्यवसायांचे आज अवमूल्यन झाले आहे. प्रामाणिकपणा, सचोटी, कर्तव्यनिष्ठा, शुचिता इत्यादी नैतिक मूल्यांचा

सर्व व्यवसायांमधुन -हास होत आहे. मंत्र्यापासुन ते संत्र्या पर्यंत प्रत्येकाचेच हात आज अनीतीने बरबटले आहेत. अशा या भष्ट्राचाराच्या युगात केवळ शिक्षकांकडुन चारित्र्याची व नैतिकाची अपेक्षा करणे योग्य होईल काय?'तुम्ही सर्वच पथभ्रष्ट,कर्तव्यच्युत व प्रवाहपतित झाला असताना केवळ आम्हालाच ध्येयवादाचे व आदर्शाचे धडे देण्याचा तुम्हाला काय अधिकारी?'असा प्रश्न जर शिक्षकांनी समाजाला व शासनाला विचारला तर त्याचे त्यांच्याजवळ काय उत्तर आहे?एकूण शिक्षण व्यवसायाचे व शिक्षकांचे अवमूल्यन ही केवळ शैक्षणिक समस्या राहिली नसुन, तो एक सामाजिक प्रश्न झाला आहे. अशा परिस्थितीत आपल्या व्यवसायामध्ये शिक्षक समाधानी आहेत की नाही हे एक कोडेच आहे.

1.15 व्यवसायसमाधान म्हणजे काय ?

व्यवसाय समाधानाचा हा अर्थ नव्हे की, शिक्षकाच्या चेह-यावर कायम टवटवी राहवी किंवा शिक्षकांनी एखादया छंदाप्रमाणे आपला व्यवसाय जोपासावा व त्यातुन केवळ आनंत मिळावावा. व्यवसाय समाधनाचा संबंधी कमी परिश्रमात अधिक परिणामकारकता साधणे, टाळता येण्याजोग्या तणावापासून मुक्तता मिळवणे. तसेच शिक्षकांच्या शक्तीचा व परिश्रमाचा अकारण अपव्यय टाळुन त्याचा उपयोग त्याची कार्यक्षमता उंचावण्याशी आहे.

आशा हिंगर यांच्या Leadership style and Job satisfacation या ग्रंथांत त्यांनी व्यवसाय समाधान म्हणजे, "Job satisfaction is the result of various attitudes possessed by an employee. In a narrow sense, these attitudes ae related to the job and are concerned with specific factors as wages,supervision, conditions of work, advancement, opportunities, recognition of ability"-[5]

---

5 Asha Hinger " Leadership style & job satisfaction 1983 (Himalaya Publishing House Delhi. ) Page No. 64

अर्थात व्यवसाय समाधान म्हणजे व्यवसायासंबंधीच्या वेगवेगळया दृष्टिकोनांचा परिपाक आहे. हे दृष्टिकोन व्यवसायाशी संबंधीत असतील, त्यांना मिळणारा पगार, त्यांच्या कामाचे होणारे मुल्यमापन, कामा संबंधीच्या अटी, बढतीच्या संधी, त्यांच्या पात्राते संबंधीची योग्य ओळख इ.बाबतीत असतील.

## 1.16 व्यवसाय समाधानाशी संबंधीत घटक –

व्यवसाय समाधान हे अनेक घटकांचा परिपाक आहे. डॉ. प्रदिपकुमार यांच्या Principles of management या ग्रंथांत त्यांनी व्यवसायसमाधानाशी संबंधीत पुढील घटक सांगितलेले आहे.

1 समस्यांची सोडवणुक – व्यवसायामध्ये येणा-या समस्यांची सोडवणुक लवकर करावी. प्रत्येकाच्या ज्या काही वैयक्तिक कामाशी संबंधीत समस्या असतील त्या आपुलकीने ऐकून त्या सोडवण्याचा प्रयत्न करावा.

2 सेवाशाश्वती – व्यवसायातील स्थैर्य हा व्यवसाय समाधानाचा एक अविभाज्य घटक आहे. अशाश्वत सेवेची टांगती तलवार डोक्यावर असणारा शिक्षक आपल्या व्यवसायत कदापि संतुष्ट असणार नाही.

3 पात्रतोप्रमाणे पगार – प्रत्येकास त्याच्या पात्रतेप्रमाणेच पगार मिळाला पाहिजे. जर आपल्या पेक्षा कमी पात्रातेचा शिक्षक जर जास्त पगार घेतांना दिसत असेल तर तो शिक्षक समाधानी असणार नाही.

4 योग्य त्या सूचनांचा आदर – शिक्षकांनी जर मुख्याध्यापकांना किंवा इतर वरिष्ठांना काही विधायक सूचना दिल्या, किंवा शालेय प्रगती संबंधी काही मते मांडली तर त्या मतांचा, सूचनांचा आदर करावा. जर सूचना योग्य असतील तर त्या अमंलात आणाव्यात.

5 कामाचे मुल्यमापन – कामाचे मुल्यमापन करतांना, जर शिक्षकांच्या चुका

असतील तर त्या सौम्य भाषेमध्ये समजावून सांगाव्यात. वरिष्ठांनी फक्त टिकाकारच होवु नये. तर चांगल्या कामासाठी पाठ ही थोपटावी.

6 वेतनवाढ - पगारामध्ये ज्या वेळोवेळी वाढी होतो. त्या शिक्षकां योग्य वेळी मिळाव्यात याची दक्षता वरिष्ठांनी घ्यावी. जर योग्य वेळी वाढ मिळाली नाही तर शिक्षक असमाधानी होईल.

7 कुवतीच्या आधारे काम -एखादा शिक्षक खुप काम करतो म्हणुन त्याच्या एवढेच दुस-यानेही करावे यासाठी बळजबरी करु नये. व्यक्ती भिन्नतेमुळे प्रत्येकाची कुवत वेगवेगळी असते. वरिष्ठांनी त्यांची कुवत लक्षात घेवुनच कामाची विभागणी करावी.

8 कामासाठी वेळ - अत्यंत दीर्घ व असुविधाजनक कामाच्या वेळा व्यवसाय समाधानावर निश्चितच परिणाम करतात. बहुतेक सर्व शिक्षकांना सोईचे व्हावे अशी कामाची वेळ तसेच तासिकांची विभागणी असणे आवश्यक आहे.

9 रजा व विश्रांती - शाळेमध्ये शिक्षकांना रिकामा तास असतांना बसण्यासाठी आरामदायक फर्निचर व इतर शौचालये, पाणी या सुविधा उपलब्ध असाव्यात त्याच प्रमाणे त्याच्या गरजेनुसार त्यास रजा मिळणे आवश्यक आहे.

वरिल सर्व बाबी या व्यवसाय समाधानाशी निगडीत आहेत.

जर पगार चांगला,योग्यतेनूसार नसेल, सहयोगी शिक्षक, वरिष्ठ यांच्याशी संबंध चांगले नसतील, व्यवसाया संबंधीच्या सेवा-शर्ती फारच जाचक असतील, भविष्यासंबंधीच्या सेवा-सुविधा निश्चित नसतील व शिक्षकाचे स्वत:चे विचारच व्यवसायासाठी प्रतिकुल असतील तर या सर्व गोष्टीतुन व्यवसायासंबंधी असमाधान मिळते. तर या उलट जर व्यवसायामुळे आपल्याला मानसिक आनंद मिळत असेल, समाजामध्ये योग्य स्थान मिळत असेल, कुवतीप्रमाणे पगार मिळत असेल तर व्यवसायामध्ये समाधन मिळते.

1.17 व्यवसायसमाधान व परिणामकारकता परस्पर संबंध -

शिक्षकांच्या परिणाम कारकते संबंधी डॉ.प्रमोद कुमार म्हणतात. "It is generally agreed that the 'goodness' of an educational programme to a large extent is dependent on the quality of teachers available to implement it. A school may have excellent material resources, equipment, building, library and other facilities alongwith a curicula appropriately adopted to suit the community need, but if the teachers are misfit or indifferent to their responsibilities, the whole programme is likely to be ineffective and wasted. The problem if ubebtufucatuib if effectuve teacher is, therefore, of prime importance for realising desirable educational goals. An effecitve teacher may be understood as one who helps development of basic skills, understanding, proper work haits, desirable attitudes, value judgement and adequate personal adjustment of the students. (Ryam 19969)" [6]

याचाच अर्थ असा की जरी शाळेला परीसर चांगला असेल, इमारत मोठी,चांगली असेल, ग्रंथालय उपलब्ध असेल अश्या सर्व सुविधा असल्या तरी जर त्या शाळेमध्ये काम करणारा शिक्षक जर परिणामकारक नसेल तर यासर्व गोष्टींचा काहीही उपयोग होत नाही. एखादा शैक्षणिक कार्यक्रम चांगल्या प्रकारे आमलात आणण्यासाठी परिणामकारक शिक्षकांची आवश्यकता असते. परिणामकारक शिक्षक तोच होवु शकतो की, ज्याच्या जवळ आपल्या कामाशी संबंधीत चांगल्या सवयी आहेत, शिकवण्या संबंधीचे कौशल्य त्याच्या जवळ आहे, योग्य तो दृष्टिकोन त्याच्या जवळ आहे, चांगली मुल्ये त्याच्या अंगी आहेत, त्याच्यामधे समायोजन क्षमता आहे. अशा प्रकारचे गुण अंगी असलेला शिक्षकच परिणामकारक शिक्षक म्हणुन ओळखला जावु शकतो.

---

6 Dr. PramodKumar "Revised Manual for Teacher Effectiveness Scale" (Dept. of Psychology sardar patel University 1985) Page 1

प्रचलित व्यवस्थेबद्दल, सद्यस्थितीबद्दल असमाधान वाटणे ही मनाची नैसर्गिक प्रवृत्ती आहे. ही मानवी मनाची खास वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. मनुष्य ज्या परिस्थितीत आपले जीवन जगत असतो त्या बद्दल त्याला अंतर्मनात कुठेतरी सारखे एक असमाधान जाणवत असते.

आपल्या वास्तविक पात्रातेपेक्षा कमी प्रतीचे जीवन आपल्याला जगावे लागत आहे असे अंतर्मनात कुठेतरी त्याला वाटत असते. तसेच त्याच्या वाटेला ज्या प्रकारचे जीवन आले आहे ते अळणी,निरस वाटु लागते. कदाचित त्या जीवनाचा प्रत्यक्ष अनुभव घेत असल्याने तोच तोचपणाचाही कंटाळा त्याला येत असावा. या दोन्ही मानसिक अवस्थांचा परिणाम असा होतो की मानवाला आपण आहोत त्यापेक्षा वरच्या स्थितीत, प्रगत अवस्थेत जावेसे वाटते तसेच आहोत त्याच स्थितीत समकक्ष असलेल्या पण वेगळया स्थितीत जावेसे वाटते. याचा अनुभव आपणास वारंवार येतोच.

शिक्षक व शिक्षणाचा अतूट संबंध, शिक्षकाचे या समाज जीवनातील अनन्यसाधारण स्थान, व सद्य:परिस्थिती मुळे होणारे शिक्षणाचे अवमुल्यन या सर्व गोष्टीं च विचार केल्यास या प्रतिकुल परिस्थितीत काम करतांना शिक्षक आपल्या व्यवसायाशी समाधानी आहे की नाही हे समजणे तसे अवघडच. शिक्षक आपल्या व्यवसायाशी समाधानी असेल तरच तो शैक्षणिक उपक्रम परिणामकारकतेने पार पाडु शकते. या सर्व गोष्टीं चा विचार करता. संशोधिकेने सोलापूर शहरातील माध्यमिक शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करण्याचे निश्चित केले.

1.2 <u>संशोधन समस्येचे शिर्षक</u> -

''सोलापूर शहरातील माध्यमिक शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे,''

1.3 संशोधन समस्येचे स्पष्टिकरण -

संशोधनातून नवनवीन ज्ञान निर्मिती होत असल्यामुळे शोध करावयाचा विभाग अचूकपणे निर्देशित करणे आवश्यक आहे. म्हणुन संशोधन विषयाच्या शीर्षकामध्ये आलेल्या शब्द रचनेचा अर्थ, विषय स्पष्ट होण्यासाठी व विषयाची व्याप्ती समजण्यासाठी खालील संज्ञा दिलेल्या आहेत.

1. माध्यमिक शाळा - (Secondary School)

श.कृ.सोहोनी यांच्या शैक्षणिक टीपाकोश मध्ये माध्यमिक शाळेची पुढील व्याख्या केलेली आहे.

" अनुदान संहितेच्या (महाराष्ट्र) प्रकरण पहिले, नियम चार मध्ये माध्यमिक शाळेची अशी व्याख्या दिली आहे. शालांत प्रमाणपत्रा परिक्षेपर्यंत सर्वसामान्य शिक्षण देणारी शाळा म्हणजे मा.शाळा. अशा शाळेत इयत्ता पाचवी पासून अधिक परंतू फक्त इयत्ता दहावी पर्यंत शिक्षण देण्यात यावे. इयत्ता अकरावी व बारावी हा उच्च माध्यमिकाचा विभाग आहे. या माध्यमिक शिक्षणात व्यावसायिक शाळा, व रात्र शाळांचाही समावेश होतो. बहुसंख्य देशात दहा ते अकरा वर्षे वयाला मुलांचे माध्यमिक शिक्षण सुरु होते. माध्यमिक शिक्षणात आणखी एक प्रकार असा की, काही शिक्षणक्रम स्वयंपूर्ण असतात तर दूसरा विद्यापिठास शिक्षणाची पूर्व तयारी म्हणुन असतो. महाराष्ट्रामध्ये तो स्वयंपूर्ण आहे. मात्रा या अभ्यासक्रमात किमान विषय अनिवार्य असतात व अनेक विषय ऐच्छिक म्हणुन आहेत ".[7]

---

6 G.Terry page and J.B.Thomas with A.R.Marshal यांच्या International Dictonary Of Education मध्ये माध्यमिक शाळेची पुढील व्याख्या केलेली आहे.

7. सोहनी श.कृ. " शैक्षणिक टीपाकोष " प्रकाशक सौ.सुधा स.सोहनी पान नं.309

"1. US Secondary school for grades 7 to 12 covering the 12 to 18 age range. In some cases grades 7 to 9 may be taught in a junior high school and grades to 12 in a separate senior high school. In current usage though it usally means grades 9 to 12 see also college preparatory school." [8]

2. (U.K.) Secondary School particularly a grammer school or independent school for pupils aged 11 to 14 years." [8]

सदर संशोधनामध्ये माध्यमिक शाळा या शब्दाचा अर्थ खालील प्रमाणे घेतलेला आहे.

माध्यमिक शाळा -

सोलापूर शहरातील मराठी माध्यमांच्या अशा शाळा की, ज्या मध्ये इयत्ता 5 वी पासून अधिक परंतु फक्त इयत्ता दहावी पर्यंत शिक्षण दिले जाते.

1.3'2' शिक्षक -

श.कृ.सोहोनी यांच्या शैक्षणिक टीपाकोश मध्ये शिक्षक या शब्दाचा अर्थ खालील प्रमाणे सांगीतलेला आहे.

" शिक्षक हा सर्वसामान्य अर्थ झाला. ख-या अर्थाने शिक्षक हा प्रेरण देणारी मार्गदर्शक व्यक्ती होय. त्या अर्थी आपल्याकडील गुरु हा शब्द अन्वर्थक आहे. निव्वळ मुलांच्या डोक्यात आपल्या जवळ असलेले ज्ञान अगर माहिती कोंबणे हे अध्यापकाचे काम नाही. माहिती हा शिक्षणाचा अपरिहार्य भाग असला तरी त्याबरोबर कौशल्य, वृत्ती, अभिरुची, विद्यार्थ्यांच्या ठायी निर्माण करणे हे अध्यापकाचे काम आहे. अध्यापकाने आपल्या विषयावर प्रभुत्व मिळविले पाहिजे व तो विषय समजावून देण्याचे कौशल्य संपादले पाहिजे. शेवटी अध्यापकाच्या व्यक्तीमत्वात त्याचे प्रतिबिंब पडले पाहिजे.

---

8. G.Terry Page & J.B.Thomas with A.R.Marshal " International Dictionary of Education " Kogan Page Limited 120 Pentonville road London 1979 page 162

अध्यापन कला आता बरीच शिस्तबध्द व शास्त्रशुध्द झाली आहे म्हणुनच प्रशिक्षित झालेला नवा अध्यापक वर्ग उदयास आला आहे.'' [9]

डॉ.व्ही.एस्.पाटील यांनी शिक्षक शब्दाचा अर्थ शिक्षण-संक्रमण या मासिकात पुढील प्रमाणे सांगितलेला आहे. '' शिक्षक हा संस्कृत शब्द असून, रुढ अर्थाने आपण तो ' जो शिकवितो तो शिक्षक' असा वापरतो. पण शिक्षक या संस्कृत शब्दाचा अर्थ मात्रा शिकविणारा व शिकणारा असे दोन्ही आहेत. शिक्षकाने सतत नवनवीन गोष्टी शिकल्या पाहिजेत आत्मसात केल्या पाहीजेत व शिकविल्या पाहीजेत .'' [10] G.Terry Page and J.B.Thomas with A.R.Marshall यांच्या International Dictionary of Education मध्ये शिक्षक या शब्दाचा अर्थ पुढील प्रमाणे घेतलेला आहे. " One who teaches, especially a person employed by a school to teach."

शिक्षक या शब्दाचे असे अनेक अर्थ अनेक जणांनी वेगवेगळे घेतलेले आहेत. सदर संशोधनामध्ये शिक्षक या शब्दाचा अर्थ खालील प्रमाणे घेतलेला आहे.

शिक्षक : असा स्त्री किंवा पुरुष मार्गदर्शक की, जो मराठी माध्यमांच्या शाळांमध्ये इयत्ता 8,9,10 वीच्या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकवतो, मार्गदर्शन करतो.

1.3'3' अनुभवी शिक्षक -

असे शिक्षक की, ज्यांची माध्यमिक शाळेमध्ये शिक्षक म्हणुन 15 किंवा 15 वर्षापेक्षा जास्त सेवा झालेली आहे.

---

9 Ibid Page 301

10 डॉ. व्ही .एस . पाटील - शिक्षण संक्रमण -नोव्हेंबर १९९७ प्रकाशक महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक व माध्यमिक शिक्षण मंडळ पृ. क्र. १९

1.3'4' कमी अनुभवी शिक्षक -

असे शिक्षक की, ज्यांची माध्यमिक शाळेमध्ये शिक्षक म्हणुन 1 ते 5 वर्ष सेवा झालेली आहे.

1.3.5 व्यवसाय समाधान -

G.Terry Page and J.B.Thomas यांच्या International Dictionary of Education मध्ये व्यवसाय समाधानाचा अर्थ पुढील प्रमाणे दिलेला आहे.

" Job satisfaction - Extent to which a person is pleased or satisfied by the content and environment of his / her work or is displeased or frustrated by inadequate working conditionsand tedious job content. The process of improving job satisfaction is job enrichment." [11]

Asha Hingar यांच्या Leadership style and job satisfaction या ग्रंथात त्यांनी व्यवसाय समाधानाचा पुढील अर्थ सांगीतलेला आहे.

" Job satisfaction is the result of various attitudes possessed by an employee. These attitudes are related to the job and are concerend with specific factors as wages, supervision, conditions of work, advancement, opportunities, recognition of ability. " [12]

डॉ.प्रमोद कुमार यांच्या JSQ मध्ये व्यवसाय समाधानाचा पुढील अर्थ सांगीतलेला आहे.

" Job satisfaction is the result of various attitudes possessed by an employee towards his job (Blum, 1949). These attitudes mar be related to job factors, such as wage,job security, job environment, nature of work, opportunities for promotion, prompt removal of grivevances, opportunities of participation in decision - making and other fringe benefits.

---

11. Ibid P-192

12. Asha Hinger " Leadership Style & Job Satiasfaction" Himalaya Publishing House Delhi Page 64 Ibid Page 1

Job satisfaction may, thus, be defined as an attitude which results from a balancing and summation of many specific likes and dislikes experienced by an employee in the performance of his job (Blullock,1952), or an employee's judgeent of how well his job, on the whole, provides opportunities to satisfy his needs (Smith, 1961). It refers to one's job, his general adjustment and social relationship in and outside his job (Sinha and Sharma, 1962).

This satisfaction or dissatisfaction with one's job depends upon the positive or negative evaluation of one's own success or failure in the realisation of personal goals and perceived contribution of the job to it." [13]

सदर संशोधनामध्ये व्यवसाय समाधानाचा पुढील अर्थ घेतलेले आहे.

व्यवसाय समाधान -

व्यवसाय समाधान म्हणजे माध्यमिक शिक्षकांचे शिक्षक या व्यवसायासंबंधीचे वेगवेगळे दृष्टिकोन. शिक्षकांचे हे दृष्टिकोन व काम व कामाचे स्वरुप , वेतन ,सेवा शाश्वती बढतीच्या संधी ,संस्थेची ध्येय धोरणे , संस्थेच्या कार्यामध्ये सल्लामसलत करण्याचे समाधान, वरिष्ठांकडुन मिळणारी संस्थाप्रमुख म्हणुन वागणुक व वैयक्तिक अडचणी सोडवतांना मिळणारी वागणुक या घटकांशी संबंधित असतील.

1.4 संशोधनाची उद्दिष्टे -

संशोधन विषयाच्या शीर्षकास अनुसरुन संशोधन विषयाची पुढील उद्दिष्टे आहेत.

1 सोलापूर शहरातील माध्यमिक शिक्षक किती प्रमाणात आपल्या व्यवसायामध्ये समाधानी आहे. याचा अभ्यास करणे.

---

13 Pramod Kumar " Revised Manual of Teachers Job satisfaction " Dept. of Psychology Sardar Patel University,1985 page No. 1

2 पुरुष शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे.

३ स्त्री शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे.

4 पुरुष व स्त्री शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा तुलनात्मक अभ्यास करणे.

5 अनुभवी शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे.

6 कमी अनुभवी शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे.

7 अनुभवी व कमी अनुभवी शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे.

8 अनुदानित प्रशालेतील अनुभवी शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे.

9 विनाअनुदानित प्रशालेतील अनुभवी शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे.

10 अनुदानित व विनाअनुदानित प्रशालेतील अनुभवी शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे.

11 सोलापूर शहरातील माध्यमिक शिक्षकांच्या व्यवसाय समाधान व परिणामकारकता यांचा सहसंबंध शोधणे.

12 पुरुष शिक्षकांच्या व्यवसाय समाधान व परिणामकारकता यांचा सहसंबंध शोधणे.

13 स्त्रीशिक्षकांच्या व्यवसाय समाधान व परिणामकारकता यांचा सहसंबंध शोधणे.

14 अनुभवी शिक्षकांच्या व्यवसाय समाधान व परिणामकारकता यांचा सहसंबंध शोधणे.

15 कमी अनुभवी शिक्षकांच्या व्यवसाय समाधान व परिणामकारकता यांचा सहसंबंध शोधणे.

16 अनुदानित शिक्षकांच्या व्यवसाय समाधान व परिणामकारकता यांचा सहसंबंध शोधणे.

17 विनाअनुदानित दिाक्षकांच्या व्यवसाय समाधान व परिणामकारकता यांचा सहसंबंध शोधणे.

1.5 संशोधन अभ्यासाची गरज व महत्व -

1.51 गरज - शाळेतुन सहज फेरफटका मारल्यास लक्षात येते की, मागच्या वर्षी बी.एड्.प्रशिक्षण पूर्ण केलेले व सुदैवाने कोणत्यातरी मार्गाने शिक्षकी पेशात नोकरीत लागलेले शिक्षक सुद्धा बी.एड्.प्रशिक्षणत शिकवली जाणारी व त्यांनी आत्मसात केल्याचा अभिनय केलेली अध्यापन पद्ध्दती, कौशल्य इ.चा जाणीवपूर्वक वापर करताना, अध्यापन कार्य करताना वापरत नसल्याचे दिसून येते. याविषयीचे संशोधन अभ्याससुध्दा हेच निर्देशित करीत आहे. आज केवळ 8-9 महिन्याच्या अभ्यासक्रमातुन ' शिक्षक ' घडताना दिसत नाही. वेळोवेळी अभ्यासक्रमात थोडाफार बदल करुनही असे का घडते आहे ? खरोखर प्रशिक्षणाची डिग्री मिळविण्यापुरतीच गरज आहे का ? प्रशिक्षणावर होणारा शासनाचा, पर्यायाने जनतेचाच पैसा खर्च होवुन त्याचे फलित का दिसुन येत नाही ?

शिक्षकी पेशाविषयक ज्ञान व आवड नसलेले विद्यार्थी - शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालयात प्रवेश घेतात. बी.एड् चा कालावधी 8-9 महिन्यांचा, निकाल 85 ते 90 टक्के पर्यंत असतो आणि शिवाय व्यावसायिक डिग्री पदरात पडते. अशा अनेक कारणांनी विद्यार्थी बी.एड् ला प्रवेश घेतात. प्रशिक्षण पूर्ण केल्यावर यदाकदाचित नोकरी उपलब्ध झाली तर त्यासाठी आर्थिक झळ सोसून किंवा गैरमार्गांनी येवुन शिक्षक बनतो. असा शिक्षक त्याच नोकरीतुन आपले आर्थिक संतुलन साधण्याचाच आधी प्रयत्न करतो. त्याची मानसिकताच बदलत.

संपूर्ण शिक्षण प्रक्रियेत एक साधन व्यक्ती म्हणुन शिक्षक आपली भूमिका पार पाडित असतो. अशा मानसिकते मध्ये शिक्षक आपल्या व्यवसायाशी समाधानी आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे.

व्यक्तीभिन्नतेचे मुळे एकाच व्यवसायामध्ये काम करणारे काही शिक्षक आपल्या व्यवसायामध्ये समाधानी असतील तर काही असमाधानी असतील. ते आपणास एखादयाचा चेहरा पाहुन कळणार नाही.

व्यवसायसमाधान म्हणजे असे नाही की, फक्त छंद म्हणुन काम करावे असे वाटणे. तर विनाकारण व्यक्तिच्या शक्तिचा, पात्रतेचा व्यय न करता त्याचा उपयोग विधायक कार्यासाठी करुन घ्यावा. व्यवसाय समाधानावर परिणाम करणारे दोन प्रकारचे घटक असतात.

1. वैयक्तिक बाबी - वैयक्तिक बाबींमध्ये लिंग, शैक्षणिक पात्राता, व्यक्तीमत्व, कामाचा एकुण वेळ ,

2. व्यवसायाशी संबंधीत बाबी - पगार, बढतीची संधी, सामाजिक स्थान, स्थैर्य, जिथे काम करतो तो परिसर, भौतिक सुविधा. या घटकांचा विचार केला असता. सर्व शिक्षकांचा व्यवसाय जरी एकच असली तरी त्यांच्या व्यवसायसमाधानावर परिणाम करणारे घटक वेगवेगळे आहेत./ त्यांचे प्रमाण सर्वांसाठी सारखे असणे शक्य नाही. संशोधीका स्वत: 7 वर्षापासुन माध्यमिक शिक्षक म्हणुन कार्यरत आहे. सोलापूर शहरामध्ये तेलगु,कन्नड,मराठी,हिंदी भाषिक जनसमुदाय भिन्न प्रमाणात विखुरलेला आहे. जवळ जवळ 50 ते 60 टक्के लोक कामगार , विडीकामगार, चतुर्थ श्रेणीचे काम करणारे लोक आहेत. शैक्षणिक वातावरण म्हणावे तसे विद्यार्थ्यांच्या घरी दिसत नाही. त्यामुळे या शहरातील शिक्षकांनी खुप प्रयत्न केले तरी विद्यार्थ्यांमध्ये व्हावी तेवढी प्रगती होतेच असे नाही व त्यामुळे शिक्षक असमाधानी होण्याची शक्यता असते.

शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षक आपल्या व्यवसायामध्ये समाधानी असला पाहिजे. शिक्षक जर आपल्या व्यवसायामध्ये समाधानी नसेल तर त्याचा परिणाम शिक्षणाची गुणवत्ता घसरते. यथा शिक्षक तथा विद्यार्थी या उक्तीप्रमाणे जर आपल्याला चांगला विद्यार्थी घडवायचा असेल तर त्यासाठी चांगला शिक्षक असणे गरजेचे आहे. उपरोक्त सर्व गोष्टींचा विचार करता शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

1.52 महत्व -

सदर संशोधन मुख्याध्यापक, शिक्षक,शासकीय अधिकारी, संस्थाचालक, पालक याच क्षेत्रात कार्य करणारे सर्व संशोधक इत्यादींच्या दृष्टिने महत्वाचे व गरजेचे आहे.

मुख्याध्यापक - शिक्षण प्रकियेमध्ये मुख्याध्यापकांचे स्थान अव्वल दर्जाचे व कुटुंब प्रमुखाचे आहे. संस्थाचालक, शिक्षक, पालक व शासन अशा सर्व आघाडयांवर त्यास यशस्वीपणे काम करावे लागते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात मुख्याध्यापक हा केवळ अध्यापन करणारा व मार्गदर्शन करणारा, शालेय व्यवस्थापन व शासकीय असणारा नव्हे तर तो नवीन शैक्षणिक बदलणा-या प्रवाहांचा मागोवा घेणारा ज्ञानवर्धक,कल्पक,सामाजिक बांधिलकी माननारा, द्रष्टा व कुशल प्रशासक असतो. सदर संशोधनामुळे मुख्याध्यापकांना शिक्षकांच्या समस्या समजण्यासाठी, शिक्षकांकडुन परिणामकारक अध्यापन घडवुन आणण्यासाठी, स्वत:च्या शाळेचा दर्जा उंचावण्यासाठी तसेच स्वच्छ कार्यकुशल प्रशासन करण्यासाठी उपयोगी पडेल.

शिक्षक - बदलत्या काळानुसार समाजाच्या सामाजिक, आर्थिक,बौध्दिक, नैतिक, सांस्कृतिक व शैक्षणिक मूल्यांमध्ये बदल होत राहतील. त्यामुळे नित्याचे अध्यापन,मार्गदर्शन या व्यतिरिक्त वेगळा विचार शिक्षकांनी करावा असे अभिप्रेत

आहे. शिक्षणाच्या माध्यमातुन सामाजिक परिवर्तन घडवुन आणण्याच्या प्रक्रियेचा महत्वाचा ' अभिकर्ता ' म्हणुन शिक्षकांना भूमिका पार पाडावी लागेल. ही भूमिका पार पाडतांना शिक्षण क्षेत्राात नवनव्याने होणा-या बदलांना, निर्माण होण-या आव्हानांना सदैव सामोरे जावे लागेल. द्रष्टेपणाने त्यास काळाचे पुढे धावावे लागेल हे करत असतांना शिक्षकांना समाधानी असणे कसे आवश्यक आहे. शिक्षकाच्या व्यवसाय समाधानाचा त्याच्या परिणामाकारकतेवर कसा परिणाम होतो. हे शिक्षकांना सदर संशोधनामुळे समजेल व व्यवसाय समाधान हे शिक्षकांच्या प्रभावी शिकवण्याशी संबंधीत आहे. त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी शिक्षक याचा उपयोग करु शकतील.

शासकीय अधिकारी ,संस्थाचालक - सदर संशोधनामध्ये सेवाशाश्वती,पेन्शन,पाल्यांना शैक्षणिक सवलती, वैद्यकिय खर्चाची परिपूर्ती,वेतन,कामाचे स्वरुप व वेळ, त्यांच्या समस्या सोडवण्याच्या पध्दती, वरिष्ठांकडुन मिळणारी वागणुक अशा अनेक गोष्टी ज्या शिक्षकांच्या व्यवसाय समाधानाशी निगडीत आहेत. यांचा विचार करण्यात आलेला आहे. वरील बाबींचा विचार करता या सर्व गोष्टी शासन, प्रशासकीय अधिकारी व संस्थाचालक यांच्याशाी संबंधीत आहेत म्हणुन वरील गोष्टीविषयक ध्येय,धोरणांची आखणी करतांना शिक्षकांना कोणत्या गोष्टी मध्ये समाधानी ठेवणे आवश्यक व गरजेचे आहे हे समजू शकेल.

पालक - सदर संशोधनामध्ये स्त्राी शिक्षक व पुरुष शिक्षक यांच्या व्यवसाय समाधान व परिणामकारकतेचा तसेच अनुदानित व विनाअनुदानित प्रशालेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधान व परिणामकारकतेचा तुलनात्मक अभ्यास केल्यामुळे पालकांना आपल्या पाल्यांना शाळेत प्रवेश देतांना जो संभ्रम निर्माण होतो. तो संभ्रम सदर संशोधनामुळे थोडया फार प्रमाणामध्ये दूर होवु शकतो. व आपल्या पाल्याचे नाव कोणत्या शाळेत टाकावे हे ते चांगल्या प्रकारे ठरवु

शकतील. त्याचप्रमाणे अशा प्रकारच्या तुलनात्मक अभ्यासामुळे संस्थाचालक व शासनास व्यवसायामध्ये नवीन शिक्षक भरती करतांना या संशोधनाचा उपयोग होवु शकेल.

इतर - या क्षेत्रामध्ये काम करणा-या इतर संशोधकास संबंधीत संशोधन म्हणुन सदर संशोधनाचा उपयोग होईल.

एकंदरीत प्रस्तुत संशोधनामुळे शिक्षकांच्या व्यवसाय समाधानतेचा अभ्यास होवुन त्यासंबंधी महत्वाची माहिती मिळणार आहे. स्त्री शिक्षक व पुरुष शिक्षक यांच्या व्यवसाय समाधान व परिणामकारकता याचा संबंध तसेच अनुदानित शाळेतील शिक्षक व विना अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधान व परिणामकारकतेचा संबंध कशा प्रकारचा आहे हे समजणार आहे. म्हणुन सदर संशोधन महत्वाचे आहे. सदर संशोधन मुख्याध्यापक, पालक, शिक्षक, संस्थाचालक, शासन यांना मार्गदर्शक म्हणुन उपयुक्त ठरेल.

## 1.6 संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

**व्याप्ती :** संशोधन कोणत्या भौगोलिक विभागाशी संबंधित आहे ,त्यातील कोणत्या लोकांशी संबंधित आहे त्यांचा कोणत्या घटकांशी संबंध आहे व कोणत्या कालखंडाशी संबंधीत आहे याची माहीती देणे आणि संशोधन निष्कर्ष कोणाला लागू पडतील याचे कथन करणे म्हणजे संशोधनाची व्याप्ती स्पष्ट करणे होय.

1. सोलापूर शहरामध्ये एकूण मराठी माध्यमांच्या 67 माध्यमिक शाळा आहेत या सर्व शाळांचा समावेश सदर संशोधनामध्ये करण्यात आलेला आहे.

2. मराठी माध्यमांच्या एकुण 67 शाळांमधील 315 शिक्षकांचा समावेश सदर संशोधनामध्ये करण्यात आलेला आहे.

3. सदर संशोधनामध्ये अनुदानित शाळांमधील शिक्षकांबरोबरच विनाअनुदानित शाळांमधील शिक्षकांचाही समावेश करण्यात आलेला आहे.

4. पुरुष शिक्षकांचाच फक्त विचार न करता संशोधिकेने स्त्री शिक्षकांचाही सदर संशोधनामध्ये समावेश केलेला आहे.

5. एक वर्ष अनुभवापासून ते पंधरावर्षापेक्षा जास्त अध्यापनाचा अनुभव असलेल्या सर्व शिक्षकांचा संशोधनामध्ये समावेश करण्यात आलेला आहे.

6. या संशोधनामध्ये व्यवसाय समाधानाशी संबंधीत काम व कामाचे स्वरुप, वेतन, सेवाशाश्वती, बढतीच्या संधी, संस्थेची ध्येय धोरणे, संस्थेच्या योजना, संस्थेच्या कार्यामध्ये सल्ला मसलत करण्याचे समाधान, वरिष्ठांकडुन संस्थाप्रमुख व वैयक्तिक अडचणी सोडवणारा म्हणुन मिळणारी वागणुक इत्यादी घटकांचा विचार करण्यात आलेला आहे. कोणत्या घटकांशी संबंधित आहे व कोणत्या कालाखंडाशी संबंधित आहे याची माहिती देणे आणि संशोधन निष्कर्ष कुणाला पडतील याचे कथन करणे म्हणजे संशोधनाची व्याप्ती स्पष्ट करणे होय.

7. शिक्षकांची परिणामकारकता तपासतांना त्यांच्या जवळ असलेले शैक्षणिक कौशल्य आपल्या कामाबद्दलच्या चांगल्या सवयी, व्यवसायासंबंधी आवश्यक असा दृष्टिकोन, वैयक्तिक निर्णयक्षमता व समायोजन शिलता, विद्यार्थ्यांविषयी निर्णय घेण्याची क्षमता व मुल्यनिर्णय इ. बाबींचा विचार करण्यात आलेला आहे.

1.62 मर्यादा -

संशोधनातील ज्या घटकांवर संशोधकाचे नियंत्रण नसते तथापि ते घटक निष्कर्षांवर मर्यादा घालतात. अशा घटकांची माहिती देणे म्हणजे संशोधनाची मर्यादा स्पष्ट करणे होय. सदर संशोधनाच्या खालील मर्यादा आहेत.

1. सोलापूर शहरामध्ये मराठी माध्यमांच्या शाळांव्यतिरिक्त तेलगु,कन्नड,इंग्रजी,हिन्दी,उर्दू या माध्यमांच्याही शाळा आहेत. या शाळांचा विचार संशोधनामध्ये करण्यात आलेला नाही.

2. अनुदानित व विनाअनुदानित शाळांच्या व्यतिरिक्त तांत्रिक शाळा,मुकबधिरांच्या शाळा,आश्रम शाळा, केंद्र शासनाच्या शाळा या शाळांचा समावेश संशोधनामध्ये करण्यात आलेला नाही.

3. शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षकांच्या व्यतिरिक्त इतर सेवकांचा संशोधनामध्ये समावेश करण्यात आलेला नाही.

4. व्यवसाय समाधानाशी संबंधीत शिक्षकांचे वैयक्तिक जीवन,भाषा,जात,शैक्षणिक पात्राता, या गोष्टींचा विचार सदर संशोधनामध्ये करण्यात आलेला नाही.

5. शिक्षकांच्या परिणामकारकतेशी संबंधीत शाळेच्या भौतिक सुविधा शालेय परिसर, विद्यार्थ्यांमधील व्यक्तीभिन्नतेचा सदर संशोधनामध्ये विचार करण्यात आलेला नाही.

1.7 **संशोधन परिकल्पना**

1.71 परिकल्पना व परिकल्पनांचे प्रकार -

संशोधन परिकल्पना यालाच गृहीत - कृत्य असेही म्हटले जाते. संशोधन समस्येच्या उत्तरांपैकी संशोधकाला जास्तीत जास्त योग्य वाटणारे उत्तर म्हणजे परिकल्पना होय. डॉ.वि.रा.भिंताडे यांच्या ' शैक्षणिक संशोधन पध्दती ' या ग्रंथामध्ये दिलेली परिकल्पनेची व्याख्या पुढील प्रमाणे आहे.

" George a Lumberg P;k ers , " The hypothesis is a tentative generalization, the validity of which remains to be tested. In its most elementary stage the hypothesis may be in hunch, guess, imaginative ideas, which become the basis for the action or investigaton". [14]

परिकल्पना म्हणजे संशोधकाचा अनुभव,अभ्यास व तर्क या तिन्हींवर आधारित असे समस्येचे संभाव्य उत्तर होय.

---

14 डॉ. वि.रा.भिंताडे " शैक्षणिक संशोधन पद्धती " नूतन प्रकाशन पूणे पृ.क्र. ४६

समस्येवरचा हा पडताळा न पाहिलेला, खात्री न केलेला, परिक्षा न घेतलेला उपाय असे म्हटले तरी चालेल. परिकल्पनांच्या साह्याने संशोधनाची दिशा ठरते. माहिती कोणत्या प्रकारची व किती प्रमाणात गोळा करण्याची याचे संशोधकास मार्गदर्शन मिळते. या परिकल्पना एक वा अनेक असू शकतील. समस्या विषयाचे पृथःक्करण केल्याने उद्दिष्टे ठरविता येतात. व उद्दिष्टांच्या आधारे परिकल्पना निश्चित करता येतात. अर्थात याला अनुभव, अभ्यास व तर्क यांची जोड हवीच.

आपल्या परिकल्पना सिध्द करण्याचा संशोधकाने काडी इतकाही प्रयत्न करु नये. तसे करणे म्हणजे संशोधनाचा आत्मा गमविण्यासारखे आहे. परिकल्पना मान्य होते किंवा ताज्य ठरते. एखादी परिकल्पना ताज्य ठरणे हेही एक संशोधनच असते. पुढच्या संशोधकाला त्यामुळे अशी माहिती मिळते की ती कल्पना तत्कालिन परिस्थीतीत संशोधनात मान्य होवु शकली नाही. ते तथ्य म्हणुन त्यावेळी स्वीकारले गेले नाही. हा रस्ता हैद्राबादला जात नाही हे सांगणे म्हणजे सुध्दा मागावुन प्रवास करण-या अनेकांचे त्या रस्त्यावरुन हैद्राबादला जाण्याचे परिश्रम वाचविणेच नव्हे काय ?

परिकल्पनेचे दोन प्रकार आहेत.

1. संशोधन परिकल्पना - ज्या परिकल्पनेमध्ये अनुभवात्मक असे विधान असते त्यास संशोधन परिकल्पना म्हणतात.

2. शून्य परिकल्पना - यालाच सांख्यिकी परिकल्पना असेही म्हटले जाते. ज्या परिकल्पनेमध्ये दोन किंवा अधिक गटांच्या जनसंख्येच्या सांख्यिकीय मापनात फरक नाही असे म्हटले असते त्या परिकल्पनेस शून्य परिकल्पना असे म्हणतात. या सर्व बाबीचा विचार करता सदर संशोधनामध्ये शुन्य परिकल्पनां सादर करण्यात आलेल्या आहेत.

### 1.7.2 सदर संशोधना संबंधीच्या परिकल्पना -

1 स्त्री शिक्षक व पुरुष शिक्षक यांच्या व्यवसाय समाधान मध्ये फरक असत नाही.

2 अनुभवी शिक्षक व कमी अनुभवी शिक्षकांच्या व्यवसाय समाधान मध्ये फरक असत नाही.

3 अनुदानित प्रशालेतील शिक्षक व विनाअनुदानित प्रशालेतील शिक्षकांच्या व्यवसाय समाधान मध्ये फरक असत नाही.

4 शिक्षकांचे व्यवसाय समाधान व परिणामकारकता यांच्या मध्ये चांगला सहसंबंध असतो.